उपआयुक्त् झोनिपु कार्यालय
चाळ अधिक्षक व कल्याणाधिकारी विभाग
पुणे महानगरपालिका
जा. क्र. सीएसओ/ ३९५
दि. १६।१०।२०२०

## कार्यालयीन परिपत्रक

विषय – पुणे महानगरपालिकेच्या झोनिपु कार्यालयाअंतर्गत चाळ विभागाकडील शिल्लक सदनिका प्रतिक्षा यादीतील सेवकांना वाटप करणेबाबत.

संदर्भ – 1.उपआयुक्त झोनिपु (चाळ विभाग) जा.क्र. सीएसओ 404 दि.24/5/2013.
2. मा. महापालिका आयुक्त ठराव क्र. 6/117 दि. 11/06/2013.

पुणे महानगरपालिकेच्या झोनिपु कार्यालयाअंतर्गत चाळ विभागामार्फत वर्ग 1 ते 4 या संवर्गातील सेवकांना सदनिकांचे वाटप करण्यात येते. संदर्भ क्रमांक 2 चे मान्यतेनुसार दि. 1/4/1999 ते 30/11/2011 या मुदतीत ज्या सेवकांनी सदनिका मिळणेकामी अर्ज केलेले आहेत. अशा सेवकांच्या अर्जाची छाननी करून पात्र अर्जातील सेवकांची नावे समाविष्ट करून प्रतिक्षा यादी तयार करण्यात आली आहे. सदर प्रतिक्षा यादीत वर्ग 4 संवर्गातील 3957 सेवकांचा समावेश करण्यात आलेला आहे. सन 2012 पासुन आज अखेर प्रतिक्षायादीतील 200 सेवकांना सदनिका वाटपाची पत्रे पाठविण्यात आली आहेत.

मनपा कॉलनी क्र. 6 गंजपेठ येथे सन 2016 मध्ये बांधण्यात आलेल्या बीओटी इमारतीच्या 11 व 12 व्या मजल्यावरील 45 सदनिका व औंध येथील मेडीपॉईंट हॉस्पिटल समोरील आर-7 अंतर्गत उपलब्ध असलेल्या 10 सदनिका शिल्लक असुन वाटपाकरिता उपलब्ध आहेत. प्रतिक्षा यादीतील अनु.क्र. 201 ते 263 च्या सेवकांना उपरोक्त् सदनिका वाटपाबाबत पत्र पाठविले असता सदर सदनिका स्विकारण्यास अनेक सेवकांनी असमर्थता दर्शविली आहे. सदनिका वाटप समितीचे मा.अध्यक्ष तथा अति. महापालिका आयुक्त (विशेष) यांनी दिलेल्या आदेशानुसार चाळ विभागाकडील प्रतिक्षा यादीत समाविष्ट असलेल्या सेवकांना सूचित करण्यात येते की, मनपा कॉलनी क्र. 6 गंजपेठ येथील रिक्त 45

सदनिका आणि औंध येथील मेडीपॉईंट हॉस्पिटल समोरील आर-7 अंतर्गत 10 सदनिका अशा एकुण 55 सदनिका वाटपासाठी उपलब्ध आहेत. ज्या सेवकांची नावे सन 2012 च्या चाळ विभागाकडील प्रतिक्षा यादीत समाविष्ट आहेत, त्या सेवकांनी कागदपत्रे व वेतन बिल लेखनिकाच्या शिफारशीसह अर्ज परिपत्रक प्रसिध्द् झालेल्या दिनांकापासुन 10 दिवसाच्या आत विभागप्रमुखामार्फत चाळ विभागाकडे पाठविण्यात यावे. दि. 26/10/2020 सायकांळी 6.15 वाजेपर्यंत प्राप्त झालेले अर्जाचा विचार केला जाईल. उशिरा प्राप्त झालेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

26/10/2020

रिक्त् सदनिका स्विकारण्यास प्रतिक्षा यादीतील सेवकांनी असमर्थता दर्शविल्यास प्रतिक्षायादीत समावेश नसलेल्या गरजु मनपा सेवकांना रिक्त सदनिका वाटप करण्यात येतील याची नोंद घ्यावी. तदनंतर प्रतिक्षायादीतील सेवकांची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**टिप-** सर्व खातेप्रमुख, महापालिका सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख यांनी सदर कार्यालयीन परिपत्रकाबाबत आपल्या अधिनस्त कार्यरत असलेल्या संवर्गातील कर्मचा-यांना सुचना देऊन कार्यालयीन नोटीस बोर्डावर प्रसिध्द् करावी. या प्रसिध्द् केलेल्या कार्यवाहीचा अहवाल चाळ विभागाकडे सादर करण्यात यावा.

(शान्तनु गोयल)
अति. महापालिका आयुक्त (विशेष)
पुणे महानगरपालिका

प्रत –
सर्व खातेप्रमुख,
उपआयुक्त्, परिमंडळ क्र. 1 ते 5.
महापालिका सहाय्यक आयुक्त, सर्व क्षेत्रिय कार्यालय,